Sakal 6th Dec. 2011 Page no. 4

# 'सिल्क'ची पुणे-सिंगापूर विमानसेवा रखडली

## नागरी विमान उड्डाण मंत्रालयाच्या इच्छाशक्तीचा अभाव

**पुणे, ता. ५ :** पुणे-सिंगापूर ही सिल्क एअरवेजची विमानसेवा रखडली आहे. संमती मिळाल्यास दोन महिन्यांच्या कालावधीमध्ये ही विमानसेवा चालू होऊ शकते.

पुणे विमानतळावर वायुसेनेच्या नियमित सॉर्टिज (उड्डाणे) असल्यामुळे ही विमानसेवा चालू करण्यासाठी अडचणी येत आहेत, असे वेळोवेळी नागरी उड्डाण मंत्रालयाने सांगितले व विमानतळ प्राधिकरणानेदेखील या गोष्टीला दुजोरा दिला. अनेकदा वायुसेनेची ढाल केल्यामुळे अखेरीस मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चरच्या (एमसीसीआयए) विमानतळ समितीने थेट संरक्षण विभागाशी यासंबंधी पत्रव्यवहार केला. त्याबाबत समितीचे अध्यक्ष एस. के. जैन म्हणाले, ''वायुसेनेशी थेट बोलल्यावर नवी विमानसेवा चालू करण्यास काहीच हरकत नाही व त्यासाठी आम्ही सर्वतोपरी सहकार्य करण्यास तयार आहोत, असा सकारात्मक प्रतिसाद त्यांनी दिला. त्यांची तयारी असूनही नागरी उड्डाण मंत्रालय लवकर परवानगी का देण्यास तयार नाही. याबाबत आम्ही दिल्लीला जाऊनही बोलणी केली आहे. बाकी सगळी प्रक्रिया झाली असून, संमती न दिल्यामुळे ही विमानसेवा चालू होत नाही.''

पुण्यातून सिंगापूरला जाणाऱ्यांच्या प्रमाणात वाढ होत आहे. सिंगापूर येथून हाँगकाँग व मलेशियाला जाण्यासाठी जोडून उड्डाणे आहेत. काही वर्षांपूर्वी पुण्याहून थेट सिंगापूरला जाणारी एअर इंडियाची विमानसेवा होती. हे विमान रात्री साडे अकरा वाजता पुण्याहून निघत असे व पहाटे सिंगापूरला पोचत असे. एका रात्रीत थेट पुण्याहून सिंगापूरला जाता येत असल्यामुळे या उड्डाणाला प्रवाशांची खूप मागणी होती. परंतु, कसलीही चर्चा न करता हे उड्डाण रद्द करण्यात आले.